# प्रेसनोट

जा.क्र.स्थागुअशा/ 1097 /2020
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग.
दुरध्वनी क्रमांक - 02362-228209
Email - cyber.sindhudurg@mahapolice.gov.in
दि. 13/04/2020.

कोरोना विषाणु संक्रमणाचे पार्श्वभुमीवर राज्यामध्ये सर्वत्र लॉकडाऊन घोषित करण्यात आलेला आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये संचारबंदी जारी करण्यात आलेली आहे. अशी पार्श्वभुमी असताना देखील काही इसम मद्य वाहतुक तसेच अवैधरित्या मद्य विक्रि करत असल्याबाबतची गोपनीय माहिती प्राप्त झालेनंतर दिक्षीत गेडाम, जिल्हा पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग यांनी सर्व पोलीस ठाण्यांना कारवाई करण्याबाबत सुचना दिल्या. त्याअनुषंगाने कणकवली,बांदा, दोडामार्ग यांनी मोठया प्रमाणात कारवाई करुन एकुण 16,72,456/- इतक्या रक्कमेची अवैध दारु जप्त करुन कारवाई केली. तसेच जिल्हयातील अन्य पोलीस ठाणे यांनी दारु विकणा-या इसमांवर कारवाई करुन 1,02,980/- रक्कमची दारु जप्त केली आहे. तसेच कणकवली पोलीस ठाणे हददीतील हातभटटयांवर कारवाई करुन 60000/- रु.रक्कमचे रसायन व अन्य साहित्य उद्ध्वस्त केलेले आहे.

कोरोना विषाणु प्रादुर्भाव रोखणेकामी तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातील जनता सुरक्षित राहावी याकरीता जिल्हा पोलीस दल व्यस्त असल्याचा फायदा घेऊन दारु विक्रेत्यांनी अवैधरित्या दारुचा व्यवसाय करु नये याकरीता जिल्हयातील एकुण 126 दारु व्यावसायिकांची कसुन चौकशी जिल्हा पोलीस दलाकडुन करण्यात आलेली आहे. तसेच अवैध दारु विक्री करताना आढळुन आल्यास व सामाजिक आरोग्य धोक्यात आणल्यास तात्काळ संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची सुचना देण्यात आलेली आहे.

(मा.पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग यांच्या मान्यतेने)

(सुनिल धनावडे)
पोलीस निरीक्षक,
स्थागुअशा व जनसंपर्क अधिकारी,
सिंधुदुर्ग

प्रत- जिल्हा माहिती अधिकारी,सिंधुदुर्ग